गोपनीय

क्र.इति/२०२१—२०२२/७

व्यवस्थापन परिषद

# मुंबई विद्यापीठ

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०२१-२०२२ मधील २२ ऑक्टोबर, २०२१ च्या बैठकीचे इतिवृत्त

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०२१-२०२२ ची सातवी सभा **शुक्रवार, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता** आयेजित करण्यात आली. कोरोना विषाणूंच्या संक्रमणापासून बचाव करण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून ही सभा अभासी पध्दतीने घेण्यात आली.

सदर बैठकीस खालील मान्यवर सभासद उपस्थित होते :-

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | प्रा. रविंद्र कुलकर्णी (प्र-कुलगुरु) | सदस्य |
| ३. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ४ | प्रा. राजेश खरात | सदस्य |
| ५. | डॉ. अनुराधा मजुमदार | सदस्य |
| ६. | प्रा. अजय भामरे | सदस्य |
| ७. | प्रा. महादाप्पा गं. गोंडा | सदस्य |
| ८. | डॉ. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ९. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| १०. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| ११. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| १२. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १३ | डॉ. सोनाली रोडे, (सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग) | सदस्य |
| १४. | श्री. सुधीर पुराणिक (कुलसचिव) | सदस्य सचिव |
| १५. | डॉ. विनोद पाटील (संचालक,परिक्षा व मुल्यमापन मंडळ) | निमंत्रित |
| १६. | डॉ. प्रदीप कामथेकर (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |

➤ **स्वागत :-**

मा. कुलगुरू यांनी श्री. सुधीर पुराणिक, कुलसचिव यांची मुंबई विद्यापीठात नवनियुक्ती झाल्यामुळे व्यवस्थापन परिषदेमध्ये त्यांचे अभिनंदन व स्वागत केले तसेच त्यांच्या पुढील कार्यासाठी सर्व सन्माननीय सदस्यांनी शुभेच्छा दिल्या. तथा सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांना सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली व मा. अध्यक्षांनी विनंती मान्य करुन सभेची कार्यवाही सुरु करण्यास अनुमती दिली.

➢ **अनुपस्थिती :-**

डॉ. वैभव नरवडे व डॉ. बी.एन. जगताप यांनी त्यांची अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली :-**

**श्री. अरविंद त्रिवेदी**

रामानंद सागर यांच्या गाजलेल्या रामायण मालिकेतील रावणाची भूमिका करणारे ज्येष्ठ अभिनेते श्री. अरविंद त्रिवेदी यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक ०६ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ८२ वर्षाचे होते.

**प्रा. हरिभाऊ केदार**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. हरिभाऊ केदार यांचे दीर्घ आजाराने दिनांक ०६ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ८७ वर्षाचे होते.

**श्री. अवी बारोट**

सौराष्ट्रचा यष्टिरक्षक फलंदाज युवा क्रिकेटपटू श्री. अवी बारोट यांचे हृदयविकाराच्या झटक्याने दिनांक १५ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते २९ वर्षाचे होते.

**श्रीमती. फारूख जाफर**

ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती. फारूख जाफर यांचे दीर्घ आजाराने दिनांक १५ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी त्या ८९ वर्षाच्या होत्या.

**श्री. कांती कोळी**

कॉंग्रेसचे माजी आमदार श्री. कांती कोळी यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ७५ वर्षाचे होते.

**डॉ. सदाशिव देव**

ज्येष्ठ गणित संशोधक प्रा. डॉ. सदाशिव देव यांचे दीर्घ आजाराने दिनांक १६ ऑक्टोबर २०२१ रोजी निधन झाले. मृत्यसमयी ते ८८ वर्षाचे होते.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र. १ | दिनांक ७ व ८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या अधिसभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार विद्यापीठात कार्यरत हंगामी कर्मचा-यांच्या वेतनासंदर्भात. | मानव संसाधन विकास कक्ष |
| ठराव | विद्यापीठात कार्यरत हंगामी कर्मचा-यांच्या वेतनवाढ हा विषय संवेदनशील असल्यामुळे मा. अध्यक्षांच्या अनुमतीने ॲड. निल हेळेकर यांनी हंगामी कर्मचा-यांची संघटना व विविध कर्मचा-यांनी औद्यागिक न्यायालयात दाखल केलेल्या याचिकांबाबत सभागृहास सविस्तर माहिती दिली. तसेच औद्यागिक न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्देश व निर्णय यांचीही सविस्तर माहिती सभागृहास दिली व विद्यापीठाच्या काही रिक्त पदांवर शासनाच्या अनुमतीने, पदभरतीची योग्य प्रक्रिया राबवून पात्र हंगामी कर्मचा-यांना सेवेत सामावून घेण्यात येऊ शकते का किंवा कसे याबाबत चाचपणी करावी असे त्यांनी त्यांचे मत व्यक्त केले. सध्या कार्यरत असणा-या स्थायी व हंगामी कर्मचा-यांच्या संख्येच्या अनुषंगाने विद्यापीठातील कामाचे वर्क ऑडीट (कार्य परिक्षण) करण्यात यावे. त्यातून वर्ग-क, वर्ग-ड या संवर्गामध्ये गरजेपेक्षा जास्त कर्मचारी आहेत का याचे आकलन होईल. विद्यापीठामधील अनेक विभागातील कामांचे ~~डीजीटलीकरण~~/संगणकीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे काही विभागात आवश्यकतेपेक्षा कर्मचा-यांची संख्या जास्त झालेली आहे. त्या कर्मचा-यांना ज्या विभागांमध्ये जास्त काम आहे अशा विभागांमध्ये सामावून घेता येईल.<br><br>श्री. राजन कोंळबेकर यांनी सुचविले की, आजच्या महागाईनुसार हंगामी कर्मचा-यांचे वेतन बारा ते पंधरा हजारापर्यंत वेतनवाढ करण्यात यावी.<br><br>वर्क ऑडीट करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्यात यावी व सदर समितीने त्यांचा अहवाल विद्यापीठास लवकरात लवकर सादर करावा. तज्ञ समितीच्या अहवालानुसार हंगामी कर्मचा-याबाबत योग्य तो निर्णय प्रशासनाला घेता येईल. वर्क ऑडीट करण्यासाठी तज्ञ समिती गठीत करण्यासाठी झालेल्या चर्चेत प्राचार्य महादप्पा गोंडा, श्री. प्रदिप सावंत, डॉ. सुभाष वाघमारे, प्रा. राजेश खरात, डॉ. अनुराधा मजुमदार यांनी आपली मते मांडली.<br><br>वर्क ऑडीट बाहय संस्थेकडून करून घेण्यात यावे जेणेकरून नि:पक्षपातीपणे निरिक्षणे नोंदविली जातील व जलदगतीने अहवाल विद्यापीठास प्राप्त होईल. वर्क ऑडीट बाहय संस्थेकडून किंवा विद्यापीठ | |

प्रशासनाकडून स्थापन करण्यात आलेल्या समितीतर्फे करण्यात यावे याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घ्यावा असे ॲड. निल हेळेकर यांनी प्रतिपादन केले. ॲड. निल हेळेकर यांच्या मताशी प्रा. अजय भामरे यांनी सहमती दर्शविली. तसेच सदर समितीमध्ये विद्यापीठाचे कुलसचिव यांचा समावेश असावा व ज्या विभागाचे ऑडीट आहे त्यावेळी तात्पुरत्या स्वरूपात संबंधित विभागप्रमुखांना त्या समितीमध्ये सदस्यत्व देण्यात यावे असे श्री. दिपककुमार मुकादम यांनी प्रतिपादन केले.

प्र-कुलगुरूंनी सांगितले की, हंगामी कर्मचा-यांना विद्यापीठ सेवेत सामावून घेण्याबाबत किंवा त्यांना वेतनवाढ देत असताना विद्यापीठाच्या आर्थिक बाजूचाही प्रकर्षाने विचार करण्यात यावा. सद्यस्थितीत विद्यापीठाची आर्थिक बाजू अत्यंत कमकुवत आहे. असे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच वर्क ऑडीट करण्यासाठी समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात यावे असे मत मांडले.

प्रा. महादाप्पा गोंडा यांनी प्र-कुलगुरू यांनी मांडलेल्या प्रस्तावास अनुमोदन दिले व सदर समितीमध्ये शासनाचे प्रतिनिधी म्हणून शासकीय अधिका-यांचा समावेश असावा जेणेकरून विद्यापीठासाठी आवश्यक असणा-या कर्मचारी पदांची शासनाकडे मागणी करताना शासकीय अधिका-यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरेल असे सुचविले. तसेच प्रा. महादाप्पा गोंडा यांनी वेतन अनुदानाची बाबही निर्दशनास आणून दिली.

डॉ. सोनाली रोडे, सह-संचालक यांनी सांगितले की, वर्क ऑडीट बाहय संस्थेकडून करून घ्यावे किंवा विद्यापीठाचे कुलसचिव, शासकीय अधिकारी यांचा समावेश असलेल्या समितीकडून करावे हा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घ्यावा व वर्क ऑडीट ठराविक वेळेत पूर्ण करण्यात यावे. काही हंगामी कर्मचा-यांची सेवा दहा ते पंधरा वर्षे झाल्यामुळे त्यांना वयाच्या अटीमध्ये शिथिलता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात यावा जेणेकरून शासन त्याचा सकारात्मक विचार करू शकते असे सुचित केले. तसेच वेतनवाढी संदर्भातील विविध शासन निर्णयांचा विचार करून किमान वेतन बाबत निर्णय घेण्यात यावा असे प्रतिपादन केले.

अंतिमत: मा. कुलगुरू यांनी सांगितले की, आतापर्यंत काय झाले यापेक्षा भविष्यात आपणांस काय करता येईल याचा विचार करण्यात यावा. वर्क ऑडीटसाठी लवकरात लवकर एक समिती गठीत करण्यात येईल व हया समितीच्या कामासाठी ठराविक कालावधी निर्धारीत

| | | |
|---|---|---|
| | करण्यात येईल. हंगामी कर्मचा-यांना वेतनवाढ देताना शासन निर्णय, इतर विद्यापीठातील वेतन रचना, महागाई या सर्व बाबींचा व विद्यापीठाच्या आर्थिक बाजूंचा विचार व्हावा. तसेच वित्त व लेखा अधिकारी यांनी लवकरात लवकर अभ्यास करून किती वेतनवाढ दिल्यानंतर कीती आर्थिक भार विद्यापीठावर पडणार आहे. विद्यापीठाच्या अर्थसंकल्पामध्ये वेतनवाढीसाठी तरतुद आहे का, या संदर्भात शासनाची मदत घेता येईल का, अशा सर्व बाबींचा अभ्यास करून एक अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करावा. सर्वानुमते वर्क ऑडीटसाठी समिती व वेतनवाढीसंदर्भात प्रस्ताव तयार करण्यासाठीची समिती गठीत करण्याचे अधिकार सर्वांनुमते मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |

कुलसचिवांनी अध्यक्षांचे आभार मानून त्यांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

उपकुलसचिव

कुलसचिव

प्र–कुलगुरू

**इतिवृत्त मंजूर**

कुलगुरू